UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
Special Issue : Volume-10 : Issue-1 (January-2024)
ISSN
2455-4375

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, आणि संशोधन मंडळ... एक प्रगती दर्शक युग

**डॉ. स्वाती मोहरीर**
मो. न.९४२२१०१८६२

---

**प्रास्तविक:**

ग्रंथ साहित्य संस्कृतीच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरणारा मराठी भाषेतील हस्तलिखितांच्या शास्त्रीय सूचीचा पहिला खंड पुण्यात प्रसिद्ध करण्यात आला. अमेरिकेचे डॉ. अँन फेल्डहौस आणि भांडारकर संस्थेचे निवृत्त ग्रंथपाल वा.ल.मंजूळ यांच्या परिश्रमातून संपादित झालेला हा ग्रंथ. ज्ञानाचे संवर्धन होत असलेली मौखिक परंपरा हे पिढ्यान पिढ्या आदिम जमाती पासून ते सिंधू नदीच्या तीरावर फुललेल्या हिंदू संस्कृतीपर्यंत सर्वत्रच रूढ होती. दगडावर कोरून ठेवणारी लिपी पासून ते कमळाच्या पानावर, कधी शिळांवर, कधी ताम्रपटांवर, कधी कागदावर ...इथ पर्यंतचा प्रवास हा ज्ञान साधनेचा प्रमुख घटक होता. छपाई चा शोध लागला आणि हस्तलिखितांचा वारसा अडगळीत आला. आज इतकी प्रगती झाली आहे की मोबाईल, स्मार्टफोन, लॅपटॉप, कम्प्युटर, यांच्यावर टाईप करण्याचा वेग अधिक आहे. त्यामुळे कधीकाळी सुवाच्च अक्षरात लिहिली पाने दुर्मिळ होत चालली आहे. यासाठीची असलेली दूरदृष्टी आणि इतिहासाच्या संशोधनाची गरज लक्षात घेऊन वि. का. राजवाडे यांनी या क्षेत्रात अनन्यसाधारण असे कार्य, कर्तुत्व केले आहे.

**संशोधन म्हणजे काय?**

संशोधन ही एक पद्धतशीर तपासणी आहे, ज्यामध्ये संशोधन विकास, चाचणी आणि/किंवा मूल्यमापन यांचा समावेश आहे, जे सामान्यीकरण करण्यायोग्य ज्ञान विकसित करण्यासाठी किंवा त्यात योगदान देण्यासाठी डिझाइन केलेले आहे .अशा संशोधनाला प्रेरित करण्यासाठी, मदतीसाठी संशोधन मंडळ कार्य करते.

**संशोधनाचे महत्त्व काय?**

संशोधन अज्ञात गोष्टींवर उपाय प्रदान करण्यास, ज्ञानातील अंतर भरून काढण्यास आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यास सक्षम आहे . तथापि, अलीकडे एक ट्रेंड आहे जो प्रमोशनसाठी प्रकाशित करण्यासाठी संशोधन कमी करत आहे.

मात्र ज्यांनी आपले सर्व जीवन इतिहास संशोधन आणि ज्ञानसाधना करण्यासाठी वाहून घेतले ते वि.का. राजवाडे हे संशोधनाच्या क्षेत्रातील एक milestone ठरले आहेत.

**इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे:**

यांचा जन्म कोकणातील वसई येथे झाला. त्यांचे संपूर्ण नाव विश्वनाथ काशिनाथ राजवाडे. लहान

वयातच त्यांच्या वडिलांचे निधन झाल्यामुळे त्यांचे पालन पोषण त्यांच्या काकांनी केले आणि त्यांचे प्राथमिक शिक्षण वडगाव येथे झाले. कुशाग्र बुद्धीचे आणि अभ्यासू विद्यार्थी म्हणून नावाजले गेलेले वि.का. राजवाडे यांचे भाषा आणि गणित या दोन विषयांवर विशेष प्रभुत्व होते. राजवाडे यांचे माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण मात्र पुणे येथे झाले केवळ परीक्षा पास होण्यासाठीच करावे लागणाऱ्या वाचन लेखनामुळे त्यांचे मन रमत नव्हते त्यामुळे ते महाविद्यालय चुकवुन स्वतःला कोंडून घेत आणि स्वतंत्र ज्ञान साधना करीत असत इंग्रजी मराठी संस्कृत इत्यादी भाषेतील अनेक ग्रंथ वाचून स्वतंत्र अशा संशोधनाला त्यांनी व्यापक स्वरूप दिले होते. आणि त्यामुळेच त्यांच्या या तपामुळे ते लहान वयातच प्रकांड पंडित बनले.

१८६४ मध्ये जन्म झालेल्या राजवाड्यांनी आपल्या ६२ वर्षाच्या आयुष्यामध्ये तीस वर्ष इतिहास संशोधनाच्या कार्यामध्ये व्यस्त केला त्यामुळे १९२६ पर्यंतच्या कालखंडाला इतिहास संशोधनाच्या संदर्भात राजवाडे युग असे संबोधले जाते.

राजवाडे यांचा १८९० आली विवाह झाला मात्र त्यांची पत्नी लवकर निवर्तल्यामुळे अजूनच त्यांनी आपला पूर्णवेळ सर्व जीवन इतिहास संशोधन आणि ज्ञानसाधना यांना समर्पित केले. यामागे मात्र प्रेरणा ही ज्ञानार्जनाची नसून राष्ट्रीय होती स्वदेशभक्तीची होती. भारत इतिहास संशोधन मंडळातील पदाधिकाऱ्यांशी मतभेद झाल्यामुळे इतिहासाचार्य विकास राजवाडे यांनी पुणे सोडून धुळे गाठले. त्यांनी २६ वर्षाच्या वास्तव्यामध्ये इतिहास संशोधनाचे अमूल्य असे काम केले. या काळात त्यांनी इतिहास आणि संपूर्ण साहित्य विश्वाला एक वेगळीच दिशा देण्याचा प्रयत्न करताना अनेक ग्रंथांची निर्मिती केली. एकूण ३६ वर्षाच्या कार्यरत आयुष्यामध्ये त्यांनी प्लेटोच्या रिपब्लिक या ग्रंथाचे भाषांतर, मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथावलीचे २२ खंड, विशेषता यातील काही खंडांना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना या त्यांच्या विवेचक बुद्धीचा आणि सखोल व्यासंगाचा प्रत्यय आणून देणारे आहेत. त्यांची प्रस्तावना अतिशय अभ्यासपूर्ण आहेत. त्यांचे संशोधन आणि लेखन त्यांनी संपादित केलेले ग्रंथ यांचे महत्त्व अनन्यसाधारणच आहे. राधामाधव, विलासचंपू व महीकावतीची बखर यांच्या प्रस्तावना म्हणजे भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासाचे राजवाडे कृत गंभीर तत्वचिंतनच आहे. विश्ववृत्त ग्रंथमाला सरस्वती मंदिर प्राचीप्रभा इत्यादी नियतकालिकातून त्यांनी केलेले स्पोर्ट लेखन हे अत्यंत मौलिक स्वरूपाचे आणि वाचकांना प्रेरक ठरणारे असे आहे तसेच मराठी भाषेचा धातूकोश हा ही राजवाडे यांच्या स्मृतीसाठी विशेष कार्य समजले जाते.

असंख्य अडचणींना तोंड देत, हाल अपेष्ठांना सहन करीत त्यांचे संशोधन हे जितके विपुल तितकेच विविध सर्वगामी आणि मूलगामी ठरले.

**संशोधनं मंडळाची निर्मिती :**

३१ डिसेंबर १९२६ रोजी इतिहासाचार्य राजवाडे यांचे निधन झाले त्यांनी संशोधन क्षेत्रात केलेले काम अखंडितपणे सुरू राहण्यासाठी, त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी बोलावलेल्या सभेतच त्यांच्या शिष्यांनी इतिहासाचार्य राजवाडे संशोधन मंडळाची स्थापना केली. संशोधन क्षेत्रात केलेले काम अखंडितपणे सुरू राहावे

म्हणून आपल्या कारकीर्दीत जमवलेले सर्व  दस्तऐवज, ग्रंथ संपदा, एकत्रित करून संशोधन आणि संशोधकांना उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी सुरू केले होते म्हणूनच त्यांच्या नावाने असलेले एकमेव संशोधन मंडळ म्हणजे राजवाडे संशोधन मंडळ होय.

**ग्रंथालयाची स्थापना :**

इतिहासाचार्य विकास राजवाडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ स्थापना झालेल्या संशोधन मंडळाची स्थापना ९ जानेवारी १९२७ रोजी धुळे येथे झाले. संशोधकांसोबत अभ्यासकांना या ग्रंथालयाचा उपयोग व्हावा हा एकमेव उद्देश होता. राजवाडे यांनी आपल्याजवळ जतन केलेले सर्व हस्तलिखिते, दुर्मिळ पुस्तके, आणि ग्रंथसंपदा सर्व संशोधकांना आणि अभ्यासकांना उपयुक्त ठरण्यासाठी लाभ दिलेला होता. त्याचाच उपयोग या संशोधन मंडळात ही सगळी संपत्ती ठेवून संशोधकांना मराठीचा खजिनाच प्राप्त करून दिला. शहरातील एकमेव मध्यवर्ती ठिकाण असलेले ग्रंथालय तीस हजारांपेक्षा जास्त ग्रंथ असलेल्या आणि ८०० पेक्षा अधिक सभासद असलेल्या ग्रंथालयात वाचक अभ्यासक आणि संशोधक यांची नेहमीच वर्दळ असते.

**मौल्यवान साहित्य संपदा :**

पुरातन ग्रंथालय असल्यामुळे स्थापनेपासूनच अनेक अभ्यासक वाचक आणि इतर सभासद हे या ग्रंथालयाचा पुरेपूर उपयोग करतात. या ग्रंथालयात मंडळाचे संदर्भ ग्रंथालय देखील आहे. त्यात छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, शिवाजींची राजनीती, राजवाडे चरित्र, इतिहास, वि का.राजवाडे यांचे सामग्र साहित्य, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड एक ते अकरा, सोर्स ऑफ मराठा हिस्टरी चे पाचखंड, गीताई, धर्म सार, कॉंग्रेस शताब्दी, संशोधक विशेषांक, नंदुरबार दप्तर, मराठी हस्तलिखित, ग्रंथ संशोधक त्रैमासिकाचे दुर्मिळ ग्रंथ, नंदुरबार, धुळे जिल्ह्याचे चळवळीतील योगदान, असे अनेक दुर्मिळ ग्रंथ येथे उपलब्ध आहे. त्यातील काही ग्रंथ विक्रीसाठी पण ठेवले आहेत. तसेच अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले संदर्भ ग्रंथ देखील येथे आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी देखील इथे भेट देत असतात, आणि संशोधन करीत असतात. ग्रंथालयात दोनशे दिवाळी अंक जवळपास दरवर्षी उपलब्ध होतात तसेच दररोज मराठी हिंदी इंग्रजी भाषेतील एकूण चाळीस वर्तमानपत्रे, पन्नास मासिके, वीस पाक्षिके, आणि चौदा साप्ताहिके, मागविले जातात.

असा सर्व मराठी साहित्याचा साठा एकाच छताखाली उपलब्ध असल्यामुळे तसेच वाचकांसाठी वेळोवेळी स्पर्धा नामवंत मार्गदर्शकांची व्याख्याने चर्चासत्रे ग्रंथालय कार्यशाळा आयोजित केल्यामुळे हे ग्रंथालय उपक्रमशील असे आहे.

राजवाडे यांनी जमवलेले ऐतिहासिक दस्तऐवज, हस्तलिखिते, ग्रंथसंपदा जतन करून ते संशोधन व संशोधकांना उपलब्ध आहेत.. त्यासोबतच ललित, चरित्र, धार्मिक, ज्योतिष्य, पर्यावरण, संदर्भ. इत्यादी शिक्षणाच्या अनेक ग्रंथांचा संग्रह आहे... एम फिल, पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असे संदर्भ येथे अभ्यासाला उपयोगी पडतात.

**राजवाडे यांचे संशोधनातील कार्य :**

राजवाडे यांनी स्वतःच्या नावावर स्वतंत्र असा एकही ग्रंथ केलेला नाही मात्र त्यांनी नियतकालिकातून लेख लिहिले आणि अधिकाधिक ग्रंथांचे संपादन केले. मुख्य म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करून ती तब्बल २२ खंडांमध्ये छापली, त्याच्यापैकी काही खंडांना प्रस्तावना आलेल्या आणि त्या प्रस्तावना संपादनापेक्षा अधिक गाजल्या. ज्यांना या प्रस्तावना आवडल्या नाही त्यांनी त्यांना अविश्रांत कष्ट घ्यायला भाग पाडले, आणि संशोधनासाठी ऋणी केले. इतिहासाच्या साधनसामग्रीसाठी त्यांच्या ऋणात राहण्यापासून पर्यायच नाही कारण त्यांनी त्यासाठी प्रचंड भ्रमंती करून जमा केलेले दस्तऐवज संशोधनासाठी महत्त्वाचे ठरले. त्यामुळे महाराष्ट्राच्या विचार विश्वात इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांचा मोठा दरारा, धबधबा आणि धाक होता. ते त्यांच्या कारकिरदीतच उदाहरण बनले होते. इतिहासकार राजवाडे हे बुद्धिमान तर होतेच तसेच प्रतिभा शक्तीची ही देणगी लाभली होती आणि सोबतच आत्मविश्वास हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

इतिहास लेखन, अंतिम चित्र, भाषाशास्त्र, व्युत्पत्ती, व्याकरण अशा अनेक विषयांवर संशोधन करणारे राजवाडे यांना आपल्या संस्कृतीचा अभिमान होता पण त्याहून अधिक ते सत्याचे अभिमानी होते, त्यामुळे संस्कृतीत त्यांना जे जे दोष वाटते तेथे त्यांनी सांगितले, मांडले. मराठी भाषेमध्ये योग्यता वाढावी म्हणून त्यांनी अतिशय प्रयत्नपूर्वक कार्य केले त्यासाठी त्यांनी भाषांतर नावाचे मासिक चालवले होते.

त्यांचा स्वार्थत्याग, अत्यंत तीव्र बुद्धिमत्ता, एकाच कार्यास वाहून घेण्याची पात्रता, राष्ट्रीय स्फूर्ती, संशोधनाची जबरदस्त आवड, इतिहास आणि मातृभाषेची अत्यंतिक आवड, पूर्वजांची ख्याती पुढे आणण्याची उत्तम लालसा , असे महत्त्वाचे गुण त्यांच्या ठायी होते.

वि.का. राजवाडे यांच्या मते इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण आणि समग्र जीवनदर्शन होय. झालेल्या राजकीय घडामोडी, सत्तातरांसाठी झालेली कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकीकती नव्हेत. इतिहास लिहिताना अस्सल कागदपत्रांच्या आधारे, पुराव्याच्या आधारेच लिहिल्या गेला पाहिजे.